दि .२०.१२.२०१९.

# वार्षिक क्रिडा मोहोत्सव २०१९ - २०
## अहवाल

डेक्कन कॉलेज ऑफ इटिरीअर डिझाईन यांच्या वतीने विभागीय वार्षिक क्रिडा मोहोत्सव २०१९ -२० चे अयोजन करण्यात आले होते. या मोहोत्सवासाठी प्रतिस्पधी महाविद्यालय म्हणून डेक्कन स्कूल ऑफ इटिरीअर डिझाईन या महाविद्यालयास आमंत्रित केले होते. दि. १३ डिसेंबर २०१९ रोजी इनडोअर स्पोर्टस व दि.१४ डिसेंबर २०१९ रोजी मौदानी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १३ डिसेंबर २०१९ रोजी संस्थेचे चेअरमन मा.श्री. सुभाष कुलकर्णी यांच्या हस्ते उदघाटन झाले. इनडोअर स्पोर्टसमध्ये कॅरम व बुध्दिबळ क्रिडा हे क्रिडा प्रकार घेण्यात आले. कॅरम या प्रकारामध्ये एकूण ३३ विद्यार्थानी सहभाग घेतला. मुलांमध्ये ओंकार लोहार आणि प्रज्चल यादव व मूलींमध्ये मैथिली सासणे व ज्ञानेश्वरी बोरगे हे विजयी झाले. तसेच बुध्दिबळ मूलींमध्ये रिटा गरग व मुलांमध्ये विशाल पाटील आणी राहूल गवसे हे विजयी झाले. इनडोअर स्पोर्टस चे आयोजन डेक्कन स्कूल ऑफ इटिरीअर डिझाईन या महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये करण्यात आले.

तसेच दि.१४ डिसेंबर २०१९ रोजी मैदानी खेळाचे आयोजन मैदान टर्फ, शिवाजी पार्क येथे करण्यात आले होते. मैदान टर्फ भाडे तत्वावर घेण्यात आले होते. या स्पर्धेचे उदघाटन डेक्कन स्कूल ऑफ इटिरीअर डिझाईन या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. आर्कि. प्रांजल कुलकर्णी व डेक्कन कॉलेज ऑफ इटिरीअर डिझाईन या महाविद्यालयाचे प्राचार्या मा. आर्कि.सिमा मालानी यांच्या हस्ते झाले. या दिवशी फुटबॉल मुले व मूली तसेच क्रिकेट मुले व मूली असे सामन्याचे आयोजन करण्यात आले होते.दोन्ही खेळामध्ये एकूण ९ संघांनी सहभाग घेतला. फुटबॉल अंतिम फेरीत डेक्कन कॉलेज ऑफ इटिरीअर डिझाईन महाविद्यालयाचे प्रथम वर्ष व तृतीय वर्ष यांच्यात सामना रंगला.या सामन्यामध्ये तृतीय वर्ष यांनी विजय मिळविला. तसेच क्रिकेट मध्ये डेक्कन कॉलेज ऑफ इटिरीअर डिझाईनचे तृतीय वर्ष व डेक्कन स्कूल ऑफ इटिरीअर डिझाईन या महाविद्यालयाचे व्दितीय वर्ष यांच्यात सामना रंगला.या सामन्यामध्ये तृतीय वर्ष यांनी विजय मिळविला. मैदानी खेळासाठी पंच म्हणून आर्कि. अनिरूध्द नलवडे व आय. डी. दिपक लोकरे यांनी काम पाहिले.

या क्रिडा मोहोत्सवामध्ये दोन्ही महाविद्यालयांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. या स्पर्धेचे नियोजन साईराज मुटगेकर, कुणाल शिंदे, निल रॉड्रिक्स, सिध्देश जाधव, गणेश चौधरी, प्रियांका जाधव, या विद्यार्थांनी काम पाहिले.

जिमखाना विभाग प्रमुख
(आय. डी. दिपक लोकरे)

प्राचार्या
(आर्कि. सिमा मालानी)

# इनडोअर स्पोर्टस








मैदानी खेळ









